क्रमांक २अ/एडीएम/प्रवेश/२०११ दिनांक १४.०६.२०११

# प्रेस नोट

# एमएचटी-सीईटी २०११

महाराष्ट्र शासनाने २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षात आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र या तीनही व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता एकच सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक १२ मे २०११ रोजी घेण्यात आली होती.

या परीक्षेचा निकाल दिनांक १४ जून २०११ रोजी सकाळी १०.०० वाजंता जाहीर करण्यांत आला. विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका त्यांच्या कनिष्ठ महाविद्यालयामार्फत प्राप्त होतील. हा निकाल संचालनालयाच्या www.dte.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ही परीक्षा सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विविध केंद्रावर घेण्यात आली. सामायिक प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केलेल्या ३,०२,६८३ विद्यार्थ्यांपैकी २,९८,८९७ विद्यार्थी उपस्थित होते त्यापैकी अभियांत्रिकीसाठी २,५४,२०८ विद्यार्थी उपस्थित होते.

- सीईटीमध्ये १९० किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ३७ इतकी आहे.
- १८० ते १८९ गुण मिळविलेले १९६ विद्यार्थी आहेत.
- १६० ते १७९ गुण मिळविलेले १२४४ विद्यार्थी आहेत
- १४० ते १५९ गुण मिळविलेले ३०३१ विद्यार्थी आहेत
- १२० ते १३९ गुण मिळविलेले ५९०७ विद्यार्थी आहेत
- ११० ते ११९ गुण मिळविलेले ४५५७ विद्यार्थी आहेत
- १०० ते १०९ गुण मिळविलेले ६८३५ विद्यार्थी आहेत

अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश परीक्षेसाठी बसलेल्या उमेदवारांच्या पैकी खुल्या प्रवर्गाचे एकूण १२३६११ आणि मागासवर्गीय १३०५९७ उमेदवार पात्र ठरले आहेत.

प्रवर्गनिहाय तसेच १०० व १०० पेक्षा अधिक गुण प्राप्त झालेल्या उमेदवारांबाबतची सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| **प्रवर्ग** | **एकूण उत्तीर्ण उमेदवार** | **सर्वोच्च गुण व व उमेदवारांची संख्या** | **१०० व १००पेक्षा अधिक गुण मिळविणा-या उमेदवाराची संख्या** |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | २७९१२ | १७९(१) | ९५१ |
| अ.जमाती | ६८९९ | १७५(१) | ९० |
| वि.जा. | ४३१९ | १७९(२) | १५६ |
| एन टी १ | ५२४० | १८९(१) | २०१ |
| एन टी २ | ८०२७ | १८९(१) | २३५ |
| एन टी ३ | ५१५४ | १९२(१) | ३३५ |
| वि मा व | ५०३७ | १९०(१) | ३८६ |
| इ मा व | ६८००९ | १९२(२) | ४३०७ |
| खुला | १२३६११ | १९९(१) | १४९९७ |

**सामायिक प्रवेश परीक्षेसाठी विद्यापिठनिहाय उत्तीर्ण उमेदवारांची सांख्यिकी माहिती**

| **विद्यापीठाचे नाव** | **एकूण उत्तीर्ण** | **सर्वोच्च गुण व उमेदवारांची संख्या** | **१००व १०० पेक्षा अधिक गुण मिळविलेल्या उमेदवारांची संख्या** |
|---|---|---|---|
| मुंबई | ६१९१९ | १९८(१) | ८२१० |
| पुणे | ५३५८६ | १९९(१) | ४३७६ |
| उत्तर महाराष्ट्र | १७५०३ | १९०(१) | ६६९ |
| शिवाजी , कोल्हापूर | २४१६५ | १९४(२) | १५०६ |
| सोलापूर | ८२७५ | १९०(१) | ५६५ |
| डॉ.बा.आं.म.वि.औरंगाबाद | १८३४१ | १९७(१) | १३१४ |
| स्वा.रा.तीर्थ म.वि.नांदेड | १५९९६ | १९४(१) | १९४६ |
| रा.तु.म.नागपूर | ३२४९३ | १९०(१) | १९५० |
| संत गा बा अमरावती | २१९३० | १९१(२) | १२७१ |

राज्यात अभियांत्रिकी व औषधनिर्माण पदवी अभ्यासक्रमासाठी (स्वायत्त संस्था वगळून) शैक्षणिक वर्ष २०१०-११च्या आधारे पुढीलप्रमाणे जागा उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | शासकीय/शासकीय अनुदानित व विद्यापीठ व्यवस्थापीत संस्थामधील प्रवेशक्षमता (संस्थांची संख्या) | विनाअनुदानित संस्थामधील प्रवेशक्षमता (संस्थांची संख्या) | एकूण प्रवेशक्षमता (संस्थांची संख्या) |
|---|---|---|---|---|
| १. | अभियांत्रिकी | ५७६८(१९) | १०८५००(२९०) | ११४२६८(३०९) |
| २. | औषधनिर्माणशास्त्र | ४९०(१०) | ८६८०(१३७) | ९१७०(१४७) |

उपरोक्त प्रवेशक्षमतेमध्ये शैक्षणिक वर्ष २०११-१२ साठी नवीन संस्था , नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेत बदल यांच्या माध्यमातून वाढ होण्याची शक्यता आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-११ व २०११-१२ साठी अभियांत्रिकी सीईटी साठी बसलेल्या विद्यार्थ्यांची सांख्यिंकी माहिती

| २०१०-११ मध्ये बसलेले एकूण विद्यार्थी २,४९,०५२ | | २०११-१२ मध्ये बसलेले एकूण विद्यार्थी २,५४,२०८ | |
|---|---|---|---|
| मुले | मुली | मुले | मुली |
| १,६१,५६९ | ८७,४८३ | १,६४,६६९ | ८९,५३९ |

स्वायत्त अभियांत्रिकी संस्था तसेच अभियांत्रिकी आणि औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमधील प्रवेशप्रक्रिया दिनांक २१ जून २०११पासून सुरु होईल. त्यावेळी छापील नियमावलीसह माहितीपुस्तक विद्यार्थ्यांना अर्ज स्वीकृती केंद्रांतून उपलब्ध होईल. सद्यःस्थितीत नियमावलीची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अभियांत्रिकी महाविद्यालय,पुणे, व्हीजेटीआय मुंबई, गुरु गोविंदसिंगजी अभियांत्रिकी महाविद्यालय,नांदेड आणि वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,सांगली या ४ स्वायत्त अभियांत्रिकी संस्थांमधील प्रवेश संचालनालयामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत करण्यात येतील. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या दोन्ही प्रक्रियेसाठी अर्ज स्वीकृती व प्रमाणपत्राची छानणी एकाचवेळी करण्यात येईल. तदनंतर गुणवत्ता यादया वेगवेगळया असतील तसेच विकल्पही वेगवेगळे घेण्यात येतील व दोन्ही प्रक्रियेत Online Allotment करण्यात येईल. आय सी टी, मुंबई या स्वायत्त संस्थेचे प्रवेश

सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांवर आधारीत त्याच संस्थेमार्फत करण्यात येणार आहेत.

**अभियांत्रिकी तसेच औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी नोंदणी (रजिष्ट्रेशन) करणे अनिवार्य आहे. जे उमेदवार रजिष्ट्रेशन करणार नाहीत अशा उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेता येणार नाहीत या बाबीची नोंद घ्यावी.** केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसंबंधीची सविस्तर अधिसूचना वृत्तपत्रातून व संचालनालयाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यांत येईल..

प्र.संचालक तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई